# मराठाकालीन अर्थव्यवस्था

## शेतकरी आणि शेती उत्पादन -

### शेतकरी :-

शिवकाळात शेती हा जीवनाचा प्रमुख मार्ग असल्याने बहुतांशी लोक त्यावर अवलंबून असत. जमीन महसूल हा राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत होता. तत्कालीन कृषी व्यवस्था रयतेच्या हितासाठी होण्यासाठी छ. शिवाजी महाराजांनी जमीनदारांचे जमीनदारांचे हक्क काढून घेत जहागीर पद्धती बंद केली. जमीनदार पद्धती ऐवजी रयतवारी पद्धतीचा त्यांनी अवलंब केला. रयतवारी पद्धतीचा त्यांनी अवलंब केला. रयतवारी पद्धतीमुळे सामान्य शेतकरी व राजा यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला. नव्याने जमीन लागवडीखाली आणण्यासाठी प्रोत्साहन दिले. जनावरे, औजारे, बी-बियाने इत्यादीसाठी तगाईची पद्धत सुरु केली.

### मिरासदार व उपरे :

गावामध्ये ज्यांच्या मालकीची जमीन असे व जे ठराविक शेतसारा सरकारजमा करत असत अशांना मिरासदार म्हणजे जाई. मिरासदार जमीनीचे मालक असल्याने त्यांना गावामध्ये सन्मान होता. गावच्या गोतसभेत न्यायव्यवस्थेत ते भाग घेत असत. त्यांना स्थळकरी असेही म्हटले जाई. असे संबोधले जाईल- गावामध्ये स्वत:च मालकीची जमीन नसणारे परंतु खंडाणे जमीन करणारे लोक व मोलमजूरी करणारे लोक यांना उपरे म्हटले जाईल. उपरे संबोधल्या गेलेल्या लोकांनी ग्रामीण समाजरचनेत महत्वपूर्ण योगदान दिले असले तरी मिरासदारांच्या तुलनेत त्यांना आर्थिक व सामाजिक दर्जा दुय्यम मिळाल्याचे दिसून येते.

जमीनीला भूमाता समजले जाई. शेतकऱ्यांनी शेती केल्यावर ती उपजाऊ होत असे. शेतकरी हा समाजाचा उत्पादक घटक असे. तत्कालीन कागदपत्रात शेतकऱ्यांचा उल्लेख कुणबी रयत व रयत असा केला जाई. शेतकऱ्यांना आवश्यक सेवा पुरविणाऱ्या कारागीर लोकांना बलुतेदार म्हटले जाई. त्यांनी केलेल्या गांव व गावकरी यांच्या सेवेप्रीत्यर्थ कृषी उत्पन्नाच्या स्वरुपात (धान्य स्वरुपात) वार्षिक मोबदला देण्यात येई. शेतकरी सरकारचा हिस्सा आपल्या उत्पादनातून काढण्यापूर्वी बलुतेदारांचा वाटा काढून ठेवीत असत.

गावातील जमीन धारणेच्या मुख्यत्वेकरून तीन प्रकारच्या भूधारणा पद्धती होत्या. त्यातील पहिली पद्धत होती. मिराशी किंवा तालवाहिका दुसरी उपरी आणि तिसरी वतन जमीन धारणा पद्धत होती. मिराशी जमीन धारणा पद्धतीमध्ये जमीनीची मालकी जमीन कसणाऱ्यांकडे असायची. मालमत्ता वंशपरंपरागत व विक्रीलायक होती. मिरासदार म्हणजे मिराशीच्या जमीनीचा मालक होय.

Scanned by CamScanner

तो जोपर्यंत जमीनीचा सारा भरतो तोपर्यंत त्यांस जमिनीपासून वंचित करता येत नसे. त्याजकडून जमीन काढून घेतली तरी तीस वर्षांच्या कालावधीनंतर सुद्धा त्याला ती परत मिळविता येत होती. उपरी ह जामिनधारणा पद्धतीमुळे शेतकऱ्याला त्यांनी स्वत:ची नसलेली जमीन कसण्याचा हक्क होता. तो तात्पुरती खंडाने जमीन घेत असे. म्हणजेच उपरी एक कुळ होता मात्र त्यांच्याकडे जमिनीची मालकी नव्हती. वतन ही तिसरी जमिनधारणा पद्धत होती. ग्रामअधिकारी व कारागिरांना वतनी जमीन मिळत असे.

- शेतकरी व मराठाकालीन कृषी तंत्र:

मराठाकालीन कृषी तंत्राचा विचार करता यामध्ये मनुष्यबळ, बैलजोडी शेतीची अवजारे, बी-बियाणे खते, घात-वाफ साधने व शेती व्यवसायाची पद्धत या घटकांचा अभ्यास महत्वाचा आहे. शेतकरी पारंपारिक पद्धतीने शेती करत होता. शेती ही प्रामुख्याने पावसावर अवलंबून होती. मुस्लिम सत्ताधिशांच्या राज्यस्तरामुळे सततची युद्धजन्य परिस्थिती राही याची झळ शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसे.

मनुष्यबळ : शेती व्यवसायासाठी मनुष्यबळाची मोठी आवश्यकता असे. याकाळात यांत्रिकीकरण नव्हते.. सततची युद्धजन्य परिस्थिती, तरुणांना लष्कराची ओढ असल्याने ते सैन्यात दाखल होत असत. याचबरोबर दुष्काळ, रोगराई या नैसर्गिक आपत्तीत होणाऱ्या प्रचंड जीवित-हानीमुळे शेती व्यवसायापुढे मनुष्यबळाचा प्रश्न निर्माण होत असे.

बैलजोडी - मराठाकाळात शेतीसाठी बैलजोडीची आवश्यकता होती. या काळात जनावारे हे शेतकऱ्यांचे पशुधन होते. मात्र युद्धजन्य परिस्थितीत शेतकऱ्यांची जनावारे पळवून नेली जात असे. यामुळे शेती व्यवसाय मोडकळीस येत असे. थोडे यात गायी असतील तर बैल आणि बैल असतील, तर शेती यामुळे छ.शिवाजीराजांनी गायींच्या रक्षणाकडे लक्ष दिले. त्यांच्या पत्रातील उल्लेख 'गायी, स्त्रिया आणि रयत यांना तोशीस लागता कामा नये' असा पहावयास मिळतो.

शेतीची अवजारे - शेती व्यवसायासाठी शेतीच्या अवजारांची अत्यंत आवश्यकता होती. यामध्ये कुळव, तिफण, नांगर, कोळपा बिलंगा, पाटे, बैलगाडी इ. अवजारे सुतार, लोहार हे कारागीर बनवत असत. लाकूड व इतर साहित्य देवून शेतकरी त्यांच्याकडून शेतीची अवजारे बनवून घेत असत.

बी-बियाणे - मराठी काळात शेतकरी स्वतः बियाणांची तरतूद करत असत. प्रत्येक वर्षी आपल्या शेतामध्ये तयार होणारे त्यामध्ये उत्तम वाटणारे धान्य बियाणांसाठी वेगळे काढून ते काळजीपुर्वक जपले जाई. शेतकरी एकमेकांना दीडीच्या दराने बियाणे देत असत. बियाणे घेण्यासाठी गरजूंना शासनाकडून आर्थिक मदत करण्यात यावी, अशा महाराजांच्या अधिका-यांना सूचना असत.

खते - उत्पादन चांगले येण्यासाठी शेतकरी प्रमुख्याने शेणखतांचा वापर करत, त्यासाठी जनावरे पाळली जात. गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी, घोडा, गाढव हे पशुधन होय. त्यांच्या मलमुत्रापासुन खत तयार होई.

धात-वाफ साधणे - पावसाळ्याला सुरुवात होण्यापुर्वी पेरणी-योग्य जमीन तयार केली जाई. मोसमी पाऊस सुरु होताच योग्य वेळ साधुन पेरणीची कामे उरकली जात. शेतीत पुरेसा ओलावा नसेल तर पिक चांगले उगवत नाही व जास्त ओल असेल तर पेरणी करता येत नसे. म्हणून शेतकरी योग्य पाऊस होताच कामे बाजूस सारुन अगदी सुख:-दुखाच्या प्रसंगाला फाटा देऊन शेतीची धात-वाफ साधुन पेरणी करत असत.

शेती व्यवसायाची पद्धत - मराठा काळात शेती ही पारंपारिक स्वरुपाची होती. विहिरी, तलाव या माध्यमातुन पाणी संसाधनची साधने कमी असल्याने कोरडवाहू किंवा जिरायत शेती पद्धतीवर भर होता. उन्हाळ्याच्या प्रारंभी जमिनीची नांगरणी केली जाई. यानंतर अंतर मशागतीसाठी कुळवणी, जमिनीची साफसफाई व खते देऊन पेरणीसाठी जमीन तयार केली जाई. मोसमी पाऊस सुरु होताच योग्य वेळी पेरणी केली जाई. त्यानंतर कोळपणी, भांगलण केली जाई. त्यानंतर पीक तयार होताच. त्याची काढणी, मळणी केली जाई. या माध्यमातुन शेतकरी वर्षभराची धान्याची पुंजी करत असत.

2) शेती उत्पादन -

अ) शेतजमिनीचे प्रकार - शिवकालीन ग्रामीण क्षेत्रफळाचे दोन प्रमुख भाग होत. त्यातील पहिला भाग म्हणजे गावातील लोक वस्ती करुन राहात तो होय. यास गाव पांढरी असे म्हणत. टणक, उंचवट्याच्या जागी गावची वसाहत असे.

GoodLuck | Page No.
Date

गावचा दुसरा विभाग शेतजमीन होय. त्यास काळी आई असे संबोधले जाई. शेतजमिनीवर गावाचे पालनपोषण होत असल्याने शेजमिनीस काळी आई असे म्हटले जाई. शिवकालीन जमिनीचे प्रकार खालीलप्रमाणे

- लागवडीखालील जमिन: ज्या जमिनीवर पिकांची प्रत्यक्ष लागवड होत असे अशा जमिनीचे अव्वल, दुम, सीम म्हणजे सराय, मध्यम व कनिष्ठ असे प्रकार पडत असत. काळ्या कसदार जमिनीस असे अव्वल म्हटले. या जमिनीत दुबार पिके होणे शक्य होत असे. मध्यम प्रतीच्या जमिनीस दुम तर मुरमाड, कोरडवाहू जमिनीस सीम असे म्हटले जाई.
- वाजट जमीन -
  वाजट जमीन या प्रकारात पडीक व नापीक जमिनीचा समावेश होत असे. या जमिनीचा वापर गुरे चारण्यासाठी, बाजार भरविण्यासाठी व गावच्या यात्रांसाठी केला जाई. छत्रपती शिवाजी महाराजांनी पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी सवलती दिल्या.
- जिराईत व बागाईत -
  वरील दोन मुख्य प्रकाराव्यतिरिक्त घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या आधारे जिराईत व बागाईत असे दोन प्रकार केले जात. जिराईत जमिनीमध्ये सर्वसाधारण पिके तर बागाईत जमिनीत ऊस, हळद, भाजीपाला इत्यादींचे उत्पादन घेतले जाई.
- पाटस्थळ व मोटस्थळ -
  पाण्याच्या वर्गवारीनुसारही शेतजमिनीचे प्रकार केले जात. ज्या जमिनीला कालवा, तळे यांचे पाटाच्या सहाय्याने पाणी मिळत असे त्यास पाटस्थळ तर ज्या जमिनीला मोटेच्या सहाय्याने पाणी मिळेल त्यास मोटस्थळ असे संबोधले जाईल.

ब) कृषी उत्पादने -

मराठा कालखंडामध्ये शेती उत्पादनात दैनंदिन उपजीविकेची अन्नधान्ये आणि व्यापारी स्वरूपाची नगदी पिके असे प्रामुख्याने दोन प्रकार करण्यात येत होते. अन्नधान्याच्या उत्पादनाचाही थोडाफार व्यापार केला जाई.

Scanned by CamScanner

गावचा दुसरा विभाग शेतजमीन होय. त्यास काळी आई असे संबोधले जाई. शेतजमिनीवर गावाचे पालनपोषण होत असल्याने शेतजमिनीस काळी आई असे म्हटले जाई. शिवकालीन जमिनीचे प्रकार खालीलप्रमाणे

- लागवडीखालील जमीन : ज्या जमिनीवर पिकांची प्रत्यक्ष लागवड होत असे अशा जमिनीचे अव्वल, दुम, सीम म्हणजे प्रथम, मध्यम व कनिष्ठ असे प्रकार पडत असत. काळ्या कसदार जमिनीस असे अव्वल म्हटले. या जमिनीत दुबार पिके घेणे शक्य होत असे. मध्यम प्रतीच्या जमिनीस दुम तर मुरमाड, कोरडवाहू जमिनीस सीम असे म्हटले जाई.
- बाजट जमीन -

  बाजट जमीन या प्रकारात पडीक व नापीक जमिनीचा समावेश होत असे. या जमिनीचा वापर गुरे चारण्यासाठी, बाजार भरविण्यासाठी व गावच्या गरजांसाठी केला जाई. छ. शिवाजी महाराजांनी पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी सवलती दिल्या.
- जिराईत व बागाईत -

  वरील दोन मुख्य प्रकाराव्यतिरिक्त होतल्या जाणाऱ्या पिकांच्या आधारे जिराईत व बागाईत असे दोन प्रकार केले जात. जिराईत जमिनीमध्ये सर्वसाधारण पिके तर बागाईत जमिनीत ऊस, हळद, भाजीपाला इत्यादींचे उत्पादन घेतले जाई.
- पाटस्थळ व मोटस्थळ -

  पाण्याच्या वर्गवारीनुसारही शेतजमिनीचे प्रकार केले जात. ज्या जमिनीला कालवा, तळे यांचे पाटाच्या सहाय्याने पाणी मिळत असे त्यास पाटस्थळ तर ज्या जमिनीला मोटेच्या सहाय्याने पाणी मिळेल त्यास मोटस्थळ असे संबोधले जाईल.

ब) कृषी उत्पादने -

मराठा कालखंडामध्ये शेती उत्पादनात दैनंदिन उपजीविकेची अन्नधान्ये आणि व्यापारी स्वरूपाची नगदी पिके असे प्रामुख्याने दोन प्रकार करण्यात येत होते. अन्नधान्याच्या उत्पादनाचाही थोडाफार व्यापार केला जाई.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

• अन्नधान्याची उत्पादने -

ज्वारी -

महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशात हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाई. काही ठिकाणी खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामामध्ये हे पीक घेतले जाई. मुख्यत्वे ज्वारीचा खाद्यान्न म्हणून उपयोग केला जाई.

बाजरी -

बाजरीचा खाद्यान्न म्हणून उपयोग केला जाई. सह्याद्रीच्या पूर्वेकडील की पावसाच्या प्रदेशात हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाई. ज्वारी, बाजरीपासून भाकरी तर या पिकांच्या ताटाचा उपयोग जनावरांना चारा म्हणून करण्यात येई.

तांदूळ -

तांदळाचे उत्पादन प्रामुख्याने कोकणात व सह्याद्रीच्या पूर्वेकडील नजीकच्या प्रदेशात, जास्त पाऊस पडणाऱ्या प्रदेशात घेतले जाई. तांदळाच्या अनेक जाती आहेत. तांदळापासून भात, भाकरी व अनेकविध खाद्यवस्तू बनविल्या जातात. मेजर जार्विसने कोकणातील तांदळाच्या जमिनीचे बारा प्रकार सांगितले आहेत. तो म्हणतो, छ. शिवाजी महाराजांनी जमिनीची मोजणी केली. रायगड, अंजनवेल, रत्नागिरी, विजयदुर्ग इत्यादी भागांतून प्रत्येकी दोन गावे निवडून तेथील तीन वर्षांच्या उत्पन्नाचा अंदाज काढला व त्या आधारे सारा ठरविला. पैकी निम्मा धान्य रूपाने तर निम्मा द्रव्यरूपाने घेण्यात येत असे.

नाचणी

हे पीक प्रामुख्याने कोकणातील उताराच्या जमिनीवर व घाटमाथ्यावर घेतले जाणारे प्रमुख पीक होय. लांबूस, मुरमाड व पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीमध्ये नाचणी चांगली येते. मराठा काळात हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाई.

गहू :

कृष्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, गोदावरी व भीमा इ. नद्यांच्या सखल भागात गव्हाचे उत्पादन घेतले जाई. सह्याद्री नजीकच्या पूर्व भागातही जिथे ओढ्या पाटाच्या पाण्याची सोय आहे अशा ठिकाणी गहू व हरभरा ही पिके घेतली जात होती.

Scanned by CamScanner

कडधान्ये :

कडधान्यामध्ये मुग, मसूर, तूर, उडीद, मटकी, हुलगा इत्यादी पिकांचा समावेश होत असे. लोकांच्या दैनंदिन आहारात कडधान्यांचा वापर केला जाई. अंतर्गत व्यापारातील कडधान्य हा एक महत्वपूर्ण घटक होय

विविध प्रकारची फळे –

आंबा, फणस, चिंच, बोर, लिंबू, केळी इ. महत्वपूर्ण फळझाडे होत. कोकणात आंबा व फणसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत होते. शिवकाळात शिवापूरमध्ये आंब्याची बाग लावली होती

व्यापारी पिके व/नगदी पिके :

शेतकऱ्यांना पैसा मिळवून देणाऱ्या व्यापारी पिके किंवा नगदी पिके असे म्हटले जाई. जीवनावश्यक अन्नधान्ये गरजे एवढे मिळवून पिकवून, शेतकरी व्यापारी पिके घेत असत. व्यापारी पिकांच्या उत्पन्नाचा उद्योगासाठी उपयोग केला जाई. तसेच त्यांची निर्यातही होत असे

कापूस :

भारतीय कापड उद्योगाला प्राचीन परंपरा आहे. महाराष्ट्राच्या अनेक भागात कापसाचे उत्पादन घेतले जात होते. विदर्भाला कापसाचे कोठार संबोधले जाते. येवला, पैठण, सोलापूर, गोंदवड, पुणे, सातारा, चौल इत्यादी ठिकाणी विणकाम व्यवसाय भरभराटीस होता. पुण्यामध्ये धोतरजोड्या व जाडे भरडे कापड तयार होत असे येवला - चौल या ठिकाणी मलमलीच्या कापडाचे हातमाग होते. तर पैठण रेशमी कापडासाठी प्रसिद्ध होते. सातारा व शिवरळ या ठिकाणी मेंढ्यांच्या लोकरीपासून घोंगडी व जिन तयार करण्याचा व्यवसाय होत. वस्त्र ही आवश्यक बाब असल्याने कापूस उत्पादनाला सतत चांगली मागणी राहिल्याचे दिसते.

ऊस :

सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे व नाशिक भागांमध्ये उसाचे उत्पादन घेतले जात होते. उसापासून गुळ तयार केला जात असे. मराठा कालखंडात इंदापूर, कराड, कोल्हापूर या गुळाच्या व्यापारपेठा म्हणून प्रसिद्ध होत्या. ऊस हे एक महत्वपूर्ण नगदी पिक होय

मसाल्याचे पदार्थ :

कोकण मसाल्याच्या पदार्थासाठी प्रसिद्ध आहे. तेथे लवंग, वेलची, दालचिनी तमालपत्र, जिरे, जायपत्री, मिरे इत्यादी मसाल्यांच्या पदार्थाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात होते. मराठा कालखंडात या मसाल्याच्या पदार्थांची निर्यात जगभर होत होती

GoodLuck Page No.
Date

तेलबिया :
मुईमुग शेंग, करडई, तीळ, मोहरी यांचा तेलबियांमध्ये समावेश होतो. तेली लाकडी घाणाच्यापासून तेल काढण्याचा व्यवसाय करत असत. व्यापारी पिक म्हणून तेलबियांचे उत्पादन घेण्यात येत असे.

इतर पिके :
तंबाखू, हळद, नारळ, सुपारी यांची व्यापारी उत्पादनात गणना केली जाई. इ.स 1600 च्या सुमारास पोर्तुगिजांनी तंबाखू उत्पादनाचा मार्ग दाखविला. अगदी अल्प कालावधीत देशभर वेगाने त्याचा प्रसार घडून आला. हळद नारळ, सुपारी यांचे उत्पादनही व्यापारी तत्वानुसार घेतले जाई.

3) शेतजमिनीच्या इनामाचे प्रकार व स्वरूप -
राज्यातील सर्व जमीन ही सरकारच्या मालकीची होती. ती कसण्यासाठी मिरासदारांना व शेतकऱ्यांना मालकी हक्काने दिली जाई. याबद्दल त्यांच्याकडून उत्पन्नाचा ठराविक भाग शेतसारा (महसूल) सरकारला दिला जाई. सरकारकडून विशिष्ट सेवेबद्दल काही लोकांना, अगर स्थळांना इनाम दिले जात असे. छत्रपती शिवाजी महाराज हिंदु धर्माचे रक्षणकर्ते होते. इतर धर्माबद्दल त्यांचा दृष्टिकोण सहिष्णुतेचा होता. हिंदु धर्माप्रमाणेच इतर धार्मिक स्थळांनाही त्यांनी इनाम जमिनी देऊ केल्या.

सनदी इनाम / दिवाण निसबत इनाम :
सरकारकडून दिल्या जाणाऱ्या इनामास सनदी इनाम किंवा दिवाणनिसबत इनाम असे म्हटले जाई. या इनामात संपूर्ण शेतसारा माफ केला जाई किंवा शेतसाऱ्यामध्ये सवलत दिली जाई. शिवकालात अशा प्रकारची इनामे मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

गावनिसबत इनाम :
या इनामास धर्मादाय इनाम म्हणूनही ओळखले जाते. यामध्ये साधुसंत फकीर सर्व गावकरी एकत्र येवून एखाद्या व्यक्तीस काही जमीन इनाम देत असत. त्यास गावनिसबत इनाम असे म्हटले जाई. या इनामांचे प्रमाण फार कमी होते.

देवस्थान इनाम :
या इनामास धर्मादाय इनाम म्हणून ओळखले जाते. यामध्ये साधुसंत फकीर त्यांचे मठ, मंदिरे, मशिदी यांना जमिनीचा एखादा प्रदेश अथवा एखाद्या गावाचे महसूली उत्पन्न इनाम दिले जात असे. या उत्पन्नातून धर्मस्थळांची व्यवस्था व्हावी हा उदात्त हेतू होता. शिवाजी महाराजांनी आळंदीची ज्ञानेश्वरांची समाधी, चाफळचा रामदास स्वामींचा मठ

Scanned by CamScanner

पिंपवडचा मोरया गोसावी, सासवडचे सोपनदेवांची समाधी, पाटगावचे मौनी बाबा, इंदापूरचा काजी इत्यादिंना धर्मादाय इनाम दिल्याच्या नोंदी आहेत.

अग्रहार इनाम :

सरकारकडून ब्रम्हवृंदास अगर एखाद्या ब्राम्हणास काही जमीन अथवा एखादे गाव इनाम दिले जाई. गाव इनाम देण्यात असेल तर गावचे संपूर्ण महसूली उत्पन्न त्यांना दिले जाई. या इनामास अग्रहार इनाम असे म्हणतात.

ग्रामअधिकाऱ्यांना, बलुतेदारांना वतनी इनाम :

शिवकालीन समाजरचनेत गावाचा, व्यापार पेठेचा व परगण्याचा कारभार पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना म्हणजे पाटील, कुलकर्णी, चौगला, शेटे, महाजन, देशमुख, देशपांडे यांना मिळणारी वतनी इनामी जमीन, हककलाजिमे यांचा विचार करता हा इनामी जमिनीचाच एक भाग होय. ग्रामअधिकाऱ्याप्रमाणेच बलुतेदारांनाही सरकारकडून इनाम जमीनी मिळत असत. आजही ग्रामीण भागातील शेतजमीनीचे नावे पाहता सुतारकी, भटकी, सोनारकी, परीटकी इत्यादी उल्लेख सापडतात.

इतर इनाम :

राजा काही प्रसंगाच्या निमित्ताने आपल्या कन्येस इनाम देत असे त्या इनामास दुधभात किंवा साडीचोळी इनाम असे म्हटले जाई. स्वराज्याच्या ~~कामी~~ कामी आलेल्या सैनिकाच्या आईस अथवा बायकोस राजाकडून दिल्या जाणाऱ्या इनामास चोळखण असे म्हटले जाई. युध्दामध्ये पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकास इनामी जमीन दिली जात असे.

प्र. 4 शिवकालीन जमीन महसूल पध्दती

राज्यकारभार चालविण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च होतो. हा खर्च विविध करांच्या माध्यमातून जमा होणाऱ्या पैशातून भागवावा लागतो. शिवकाळात राज्याच्या उत्पन्नात जमीन महसूल हा सर्वाधिक होता जकात, अबकारी कर, जंगल खात्याचे उत्पन्न, टाकसाळ, युध्दातील लुट, मच्छीमारी, सागरी व्यापार इत्यादी माध्यमातून सरकारला उत्पन्न मिळत ~~टाकत~~ असे. परंतु जमीन महसूल हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत होता. शिवकालीन जमीन महसूल पध्दतीची माहिती खालीलप्रमाणे

- जमिनीची मोजणी :

शिवकाळात जमीन मोजण्यासाठी काठीचा वापर केला जात असे. या काठीस चा वापर केला शिवशाही काठी असे म्हटले जाई ही काठी पाच हात व पाच मुठी इतक्या लांबीची असे. अशा वीस चौरस काठ्यांचा ~~भाग~~ पांड निर्माण होई व वीस पांडाचा मिळून एक बिघा तयार होई. एकशे वीस चौरस एक चावर होई. कोकणामध्ये वीस चौरस पांड ऐवजी तेवीस चौरस पांडाचा एक बिघा होई.

जमीन मोजणीचे काम सरकारी अधिकारी पार पडत असत. गावातील महार वतनदार या कामी त्यांना मदत करत असे. ज्या काठीच्या हारे जमिनीची मोजणी केली जाई ती काठी महार वतनदाराकडे असे. जमीन मोजत असताना तो काठी उडवत असे म्हणजे एक काठी जमीन मोजल्यावर दुसरी काठी टाकताना ती काठी उडी घेत असे. म्हणून या काठीस चलती काठी असे म्हटले जाई.

## सारा आकारणी :

जमीनीवर कर आकारणी करण्यासाठी तिची प्रतवारी केली जात असे. शिवकालात जमिनीचे वर्गीकरण अव्वल, दुम, सीम व चारहम अशा प्रकारे केलेले आहे. अव्वल दर्जाची जमीन महाराष्ट्रात अत्यल्प होती प्रतवारी नंतर सारा आकारणी हा महत्वाचा भाग होता.

शिवकाळात तीन वेळा जमिनीची मोजणी होऊन सारा आकारणी झाली. सारा आकरणीस धारा आकारणी असे म्हटले आहे धारा म्हणजे जमिनीवरिल महसूल होय. इ.स. 1636 मध्ये पुणे जहागिरीमध्ये दादाजी कोंडदेवांनी जमिनीची मोजणी करून सारा आकारणी चे आधार घेतला होता.

इ.स. 1648 मध्ये मोरोपंत पिंगळे यांनी शिरवळ परगण्यात जमिनीची मोजणी केली व महसूल पद्धतीमध्ये महत्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यानंतर इ.स. 1678 मध्ये महाराजांचा कार्यक्षम सचिव आण्णाजी दत्तो याने जमिनीची मोजणी केली. या पध्दतीमध्ये परगण्यातील देशमुख - देशपांडे आदि अधिकाऱ्यांनी गावोगाव जाऊन पाटील - कुलकर्णी इत्यादी वतनदारांशी विचारविनिमय करून जमिनीची प्रतवारी (बिघवणी) तयार केली. त्यानंतर जमिनीत येणाऱ्या पिकांचे अंदाजपत्रक (पीक पाहणी) केली. स्वराज्यातील बिघवणी पीक पाहणीनंतर आण्णाजी दत्तोने प्रत्येक परगण्याचा सारा निश्चित केला. महाराजांनी आण्णाजी दत्तोच्या माध्यमातून केलेली सारा आकारणी ही शास्त्रीय व लोकाभिमुख होती इतिहास संशोधक डॉ. बाळकृष्ण या सारा आकारणीबाबत लोकांची धारा पध्दत असे म्हणतात.

## सारा आकारणीचे प्रमाण :

महाराजांचे समकालीन, महाराजांच्या जीवनातील अनेक घटनांचे साक्षीदार असलेले कृष्णाजी अनंत सभासद शिवकालीन सारा आकारणी याबाबत म्हणतात की, बिघ्यास पिकाचा आकार करून पाच तक्षीमा (भाग). पिकांचे करून तीन तक्षीमा रयतेस द्यावा दोन तक्षीमा दिवाणात (सरकारात) द्यावा. येणे प्रमाणे रयतेपासून घ्यावे. यावरून असे दिसते की शिवकाळात एकूण उत्पन्नाच्या 2/5 भाग सारा आकारला जाई. शिवकालात कागदपत्रात या साऱ्याचा उल्लेख

राज्यभाग पगारी असा करण्यात आला आहे.

जेधे शकावली या शिवकाळातील महत्त्वपूर्ण साधनात आकारणी बाबत अशी नोंद आहे की इ.स. 1667 पासून शिवाजी महाराजांनी आपल्या मुलखात बटाई चा अंमल जारी केला, बटाई म्हणजे महसूली उत्पन्नाचा अर्धा भाग होय. बटाई पद्धती बाबत इतिहास संशोधक डॉ. अ. रा. कुलकर्णी म्हणतात की बटाईचा प्रयोग स्वराज्याच्या सर्व भागात महाराजांनी सुरु केला असावा असे वाटत नाही. तसेच बटाईच्या अर्थ उत्पन्नाचा निम्मा भाग असा लावणे बरोबर ठरणार नाही. बटाई म्हणजे प्रत्यक्ष उत्पन्नाचा काही भाग असाच अर्थ करणे इष्ट ठरेल. बटाईचा तह ज्या भागात असेल शेतकऱ्यांवर इतर सरकारी कर लादले जात नसत. त्यामुळे रयतेवरील एकंदर भार बटाईमुळे वाढला होता असे म्हणता येणार नाही.

शिवकाळात शेतसारा रोख स्वरूपात वा वस्तूंच्या स्वरूपात गोळा केला जाई. जमिनीमध्ये ऊस, फळे, आले, हळद या नगदी पिकांवर नख्तनख्त म्हणजे रोख सारा आकारला जाई. महाराजांनी जमीन महसूलात पारदर्शकता आणली. महसूल वसूलीची ठेकेदार पद्धत बंद केली. सारा वसूल होत असता रयतेची पिळवणूक होणार नाही याची महाराजांनी दक्षता घेतली.

5 शिवकालीन रयत व त्यांचे जीवन

शिवकाळामध्ये शेतकऱ्यांना रयत, कुणबी, कुळवाडी असे म्हटले जाई. शेती हा समाजव्यवस्थेचा कणा होता. राज्याच्या उत्पन्नाचे ते प्रमुख साधन होते. त्यामुळे सरकारला रयतेची काळजी वहावी लागे.

• नैसर्गिक संकटे

शिवकालीन शेती ही निसर्गावर अवलंबून होती. ओढ्यानाल्यावर किंवा नद्यांवर छोटे छोटे बंधारे बांधून पाटाच्या माध्यमातून शेतीला पाणी पुरवठा केला जाई. पाटाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या शेतीस पाटस्थळ तर विहिरींच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या शेतीस मोटस्थळ असे म्हणतात. मात्र बागायत जमिनीचे प्रमाण अत्यल्प होते. दख्खनचे पठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशात अव्वल दर्जाची जमीन अत्यल्प होती. महाराष्ट्रातील जमिनीमध्ये वैविध्यता आढळते. कोकणात भात खाचरे, सह्याद्रीचे डोंगरउतार तर देशावर नद्यांच्या काळ्या मळीची जमीन, सपाटीवरील काळी जमीन इत्यादी प्रकार पडतात.

शेती हा पावसावरचा जुगार होता. कधी अवर्षण तर कधी अतिअवर्षण, त्यातच लष्करी धामधुमीच्या या कालखंडामध्ये शेतकऱ्यांना शांतता व सुरक्षितता लाभणे दुर्लभ होते. नैसर्गिक आपत्तींच्या शांतता व सुरक्षितता लाभणे दुर्लभ होते. नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगी शेतकऱ्यांच्या दुःखाला पारावार राहत असे.

अनेक दुष्काळ महाराष्ट्राने अनुभवले आहेत. इ.स. 1630 साली भारतात पडलेल्या दुष्काळाची भीषण झळ महाराष्ट्रालाहि सहन करावी लागली. या दुष्काळाचे वर्णन तत्कालीन अनेक कागदपत्रांमधून दिसून येते 1630 च्या दुष्काळाबाबत पातशहानाम्यात म्हटले आहे की दक्षिण देश निदान एका पिढीपर्यंत तरी दरिद्री राहिला. या भीषण दुष्काळाचे वर्णन करताना समर्थ रामदास की

तथापि मार्गची चालेना, भिक्षा मागता मिळेना ।।
अवघे भिकारीच जना, काय म्हणावे ---- ।।
कितीयेक ग्रामीची ते वोस झाली
पिके सर्व धान्येची नाना बुडाली
जन बुडाले बुडाले पोटेविण मेले।
बहु कष्टले कष्टले कितीयेक मेले
वीसा लोकात लोकात एकचि राहिले ।।

- मानवनिर्मित संकटे

सततची लढाई धामधूम यामुळे शेतीला स्थिरता लाभत नव्हती परकीय आक्रमणाचा घाला केव्हा होईल हे सांगता येत नव्हते शत्रुसैन्याची हजारोंची फौज बेदरकारपणे उभ्या पिकातून जाई. त्यावेळी हातातोंडशी आलेले पीक नष्ट होऊन जाई. शत्रुसैनिक आपल्या घोड्यांना वैरण मिळविण्यासाठी गाव लुटत, गावकऱ्यांवर अन्याय करत. स्त्रियांची बेअब्रु केली जाई शत्रूचे आक्रमण होताच भयापोटी लोक गाव सोडुन परागंदा होत. गावे उजाड होऊन महसुली उत्पन्नात ही तुट येई. काही स्वराज्यातील वतनदारांकडुनही रयतेवर अन्याय होऊन मानवी संकटामुळे सामान्य रयत कमालीची त्रासलेली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेमध्ये विश्वास निर्माण केला. गावच्या संरक्षणाची योग्य ती तजवीज केली. शत्रूला जरब बसवली. स्त्रीस्वैबाबतचे नियम घालून दिले.

6) शिवाजीमहाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी केलेल्या उपाययोजना किंवा शेतीविषयीचे धोरण :-

Unit IV

राजा कालस्य कारणम् या महाभारतातील वचनानुसार राजा हा त्या काळाचा प्रतिनिधी असतो. 17 व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या असामान्य व्यक्तिमत्वाचा ठसा उमटावा. महाराजांनी स्वराज्याच्या माध्यमातून कल्याणकारी राज्याची निर्मिती केली.